**<u>नागरिकांच्या माहितीसाठी</u>**

**<u>प्रस्तावित महाराष्ट्र लोक सेवा हमी विधेयक,२०१५ चे प्रारूप</u>**

क्रमांक संकीर्ण- २०१४/प्र.क्र. ७४/१८/(र. व का.) ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम आणि समायोचित लोकसेवा पुरविण्याच्या दृष्टीने, आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी एक सर्वसमावेशक कायदा करण्याचे योजिले आहे.

आणि ज्याअर्थी, विधानमंडळातील चर्चेपूर्वीच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून, विधेयकाचा मसुदा सार्वजनिक संकेतप्रणालीवर (पब्लिक डोमेन) टाकणे शासनास इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता, वरील प्रयोजनांसाठी, प्रस्तावित महाराष्ट्र लोक सेवा हमी विधेयक, २०१५ याचा मसुदा, याव्दारे, त्याच्याशी हितसंबंधित असलेल्या सर्व व्यक्तींकडून सूचना मागविण्यासाठी याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे आणि याव्दारे नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा हा, महाराष्ट्र शासनाकडून दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुदयाच्या बाबतीत, कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही सूचना, अपर मुख्य सचिव (प्र. सु., र. व का.), सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकापूर्वी प्राप्त होतील त्या शासनाकडून विचारात घेतल्या जातील.

# <u>विधेयकाचा मसुदा</u>

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोक सेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक,

ज्याअर्थी, नागरिकांना पारदर्शक रीतीने समयोचित व कार्यक्षम लोक सेवा देणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, पात्र व्यक्तींना लोक सेवा पुरविण्याच्या उद्देशाने शासकीय विभागांमध्ये व अभिकरणांमध्ये आणि इतर सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व आणणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोक सेवा पुरविण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी एक सर्वसमावेशक कायदा करणे इष्ट आहे. त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सहाष्टाव्या वर्षी याव्दारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:-

**<u>संक्षिप्त नाव व्याप्ती व प्रारंभ व प्रयुक्ती</u>**

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र लोक सेवा हमी अधिनियम, २०१५ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो,राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील, अशा दिनांकास अंमलात येईल.

(४) तो कोणताही अधिनियम, नियम, अधिसूचना, आदेश अथवा अन्य कोणताही सांविधिक संलेख यांमधील तरतुदींअनुसार जी प्राधिकरणे पात्र व्यक्तींना लोक सेवा देतात अशा सार्वजनिक प्राधिकरणांना लागू असेल.

२.	या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

**व्याख्या**

(क)	" समिती" याचा अर्थ कलम १३ अन्वये घटित केलेली, राज्य अधिसूचित सेवा प्रदान समिती, असा आहे.

(ख) "विभाग" यांचा अर्थ राज्यशासनाचा किंवा यथास्थिति एखादया सार्वजनिक प्राधिकरणाचा विभाग, असा आहे.

(ग) "पदनिर्देशित अधिकारी" याचा अर्थ, नागरिकांशी संबंधित सेवा पूरविण्याबाबत ज्यास फर्मा‍विण्यात आले आहे असा अधिकारी, असा आहे.

(घ) "पात्र व्यक्ती" याचा अर्थ जी व्यक्ती स्वत:च्या लाभासाठी एखादया सार्वजनिक प्राधिकरणाकडून देण्यात येणा-या सेवेचा वापर करू इच्छिते अशी वैध व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये तीचा समावेश होतो;

(ङ) "प्रथम अपील प्राधिकारी" याचा अर्थ, कलम ८ अन्वये शासनाने किंवा संबंधित सार्वजनिक प्राधिकणाने नियुक्त केलेला अपील प्राधिकारी, असा आहे;

(च) "शासन", किंवा राज्यशासन याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(छ) "स्थानिक प्राधिकरण" याचा अर्थ, कायद्यान्वये घटित केलेले कोणतेही प्राधिकरण, नगरपरिषद, महानगरपालिका, नगरपंचायत,औद्योगिक वसाहत,जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये राज्यामध्ये सार्वजनिक उपयुक्ततेच्या अत्यावश्यक सेवा पुरविण्यासाठी किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रामध्ये अशा सेवांचे नियंत्रण व्यवस्थापन किंवा नियमन करण्यासाठी कायद्याद्वारे त्या त्या वेळी कायद्याव्दारे विनिहित असलेली विकास प्राधिकरणे, नियोजन प्राधिकरण किंवा इतर सांविधिक किंवा असांविधिक संस्था मग ती कोणत्याही नांवाने संबोधण्यात येवो, यांचा समावेश होतो;

(ज) " अधिसूचित सेवा" याचा अर्थ, कलम ३ अन्वये राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या सेवा, असा आहे;

(झ) “विहित” याचा अर्थ या अधिनियमाखाली केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले असा आहे;

(ञ) “सार्वजनिक प्राधिकरण” याचा अर्थ

(क) शासनाचा कोणताही विभाग किंवा प्राधिकरणे,

(ख) (एक) भारताच्या संविधानाद्वारे किंवा त्याअन्वये, राज्यामध्ये,

(दोन) राज्य विधानमंडळाद्वारे केलेल्या इतर कोणत्याही कायद्याद्वारे;

(तीन) शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे स्थापन किंवा घटित केलेली कोणतीही संघटना किंवा प्राधिकरण किंवा निकाय किंवा संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण, असा आहे;

(ग) आणि त्यामध्ये राज्यशासनाची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष ,

१. मालकी, नियंत्रण असलेले किंवा भरीव आर्थिक पुरवठा केलेली शासकीय कंपनी किंवा प्राधिकरण यासह कोणताही निकाय, किंवा

२. भरीव आर्थिक पुरवठा केलेली कोणतीही अशासकीय संघटना यांचा समावेश आहे;

(ट) “सेवा हक्क” याचा अर्थ, शासनाने कलम ३, अन्वये वेळोवेळी काढलेल्या अधिसूचनेव्दारे विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत अधिसूचित सेवा मिळण्याचा पात्र व्यक्तींचा हक्क, असा आहे;

(ठ) “द्वितीय अपील प्राधिकारी” याचा अर्थ, प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा आदेशाविरुध्द ज्यांच्याकडे अपील करता येईल, असा, राज्य शासनाने अथवा संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने कलम ८ अन्वये नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे;

(ड) “विनिर्दिष्ट कालमर्यादा” याचा अर्थ, ज्या कालावधीत पदनिर्देशित अधिकाऱ्याने अधिसूचित सेवा दयावयाच्या आहेत असा कलम ३ अनुसार अधिसूचित केलेला कमाल कालावधी असा आहे.

**सेवा, पदनिर्देशित अधिकारी आणि विनिर्दिष्ट कालमर्यादा अधिसुचित करणे**

३. राज्य शासन, प्रत्येक विभागाखालील प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणासंबधात या अधिनियमान्वये, अशा सेवा ज्या विनिर्दिष्ट कालमर्यादेत पुरविण्यात येतील. अशा विनिर्दिष्ट कालमर्यादेसह अशा सेवा व पदनिर्देशित अधिकारी, हे या अधिनियमांच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी अधिसूचनेद्वारे अधिसूचित करील.

**विनिर्दिष्ट कालमर्यादेत सेवा मिळण्याचा हक्क**

४. (१) प्रत्येक पात्र व्यक्तीस अधिनियमाच्या कलम ३ खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेच्या आत, या अधिनियमानुसार तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यतेस अधीन राहून, राज्यातील अधिसूचित सेवा मिळविण्याच्या हक्क असेल.

(२) सार्वजनिक प्राधिकरणातील प्रत्येक पदनिर्देशित अधिकारी, अधिसूचनेत अधिसूचित केलेल्या लोक सेवा पात्र व्यक्तीस विनिर्दिष्ट मुदतीत उपलब्ध करुन देईल.

(३) सार्वजनिक प्राधिकारण त्यानी पुरविलेल्या अधिसूचित सेवांची सूची, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिल अधिकारी आणि द्वितीय अधिकारी यांच्या तपशीलासह कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करील किंवा प्रर्दशित करण्याची व्यवस्था करील.

**कालमर्यादेत विनिर्दिष्ट सेवा पुरविणे.**

५. (१) अधिसूचित सेवा मिळविण्यासाठी सर्व बाबतीत परिपूर्ण असलेला आवश्यक तो अर्ज, पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे किंवा ज्याला अर्ज स्वीकारण्यास यथोचितरीत्या, प्राधिकृत केले आहे अशा त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकाऱ्याकडे ज्या दिनांकास सादर केला असेल, त्या दिनांकापासून विनिर्दिष्ट मुदत सुरु होईल. अशा अर्जाची रीतसर पोच देण्यात येईल आणि अर्जदारास लेखी किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांमार्फत, असा अर्ज निकाली काढण्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेसह, अशा अर्जाचा दिनांक, वेळ, ठिकाण, विशिष्ट अर्ज क्रमांक, हा तपशील कळविण्यात येईल.

(२) पदनिर्देशित अधिकारी, पोट कलम (१) अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर विनिर्दिष्ट कालमर्यादेत एक तर प्रत्यक्षपणे सेवा देईल किंवा मंजूर करील किंवा तो अर्ज

नाकारील आणि अर्ज नाकारण्याच्या बाबतीत, तो नाकारण्याची कारणे लेखी नमूद करेल आणि पदनिर्देशित अधिकारी, अर्जदारास, आदेशाविरुध्द करावयाच्या अपिलाची मुदत व ज्या कोणाकडे पहिले अपील दाखल करावयाचे आहे त्या प्रथम अपिल प्राधिकाऱ्याचे त्याच्या कार्यालयीन पत्त्यासह नाव व पदनाम याविषयी लेखी कळविल.

**अर्जाच्या स्थितीचे संनियंत्रण**

६. (१) कोणत्याही अधिसूचित सेवांसाठी अर्ज केलेल्या प्रत्येक पात्र व्यक्तीस संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडून अर्जाचा विशिष्ट क्रमांक देण्यात येईल, जेणेकरुन तो, विहित करण्यात येईल अशा कार्यपध्दतीनुसार, जेथे ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित असेल तेथे, त्याच्या अर्जाच्या स्थितीबाबत ऑनलाईन संनियंत्रण करु शकेल.

(२) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, जेथे ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित असेल तेथे, ऑनलाईन अधिसूचित सेवांचे सर्व अर्जांच्या स्थितीबाबतची माहिती ठेवील आणि नियमांन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार त्या अर्जाची स्थिती अद्ययावत ठेवणे, हे त्याचे अवश्य कर्तव्य असेल.

**अधिसूचित सेवा पुरविण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर.**

७. शासन, विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत त्याच्या संबंधित अधिसूचित सेवा पुरविण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याकरिता सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना प्रोत्साहन व स्फूर्ती देईल.

**अपील प्राधिकाऱ्याची नियुक्ती**

८. (१) शासन किंवा संबंधित सार्वजनिक प्राधिकरण, विहित करण्यात येईल अशा यथोचित कार्यपध्दतीचे अनुपालन केल्यानंतर, पात्र व्यक्तिचा अर्ज नाकारण्याच्या विरोधात किंवा अधिसूचित सेवा पुरविण्यात विलंब लावल्याबद्दल त्याने दाखल केलेल्या अपिलावर सुनावणी घेण्यासाठी आणि त्यावर निर्णय देण्यासाठी प्रथम अपील प्राधिकारी म्हणून कार्य करण्याकरिता जो पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा वरिष्ठ दर्जाचा आहे अशा गट-अ च्या दर्जा पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याची किंवा त्याच्या समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्याची, अधिसूचनेद्वारे, नियुक्ती करील.

(२) शासन किंवा संबंधित सार्वजनिक प्राधिकरण अधिसूचनेद्वारे प्रथम अपील अधिकाऱ्याच्या आदेशाविरुध्द, पात्र व्यक्तिने उक्त प्राधिकरणाकडे कोणताही अर्ज थेट

दाखल केलेला असल्यास, त्या अर्जावर सुनावणी घेण्यासाठी आणि त्यावर निर्णय देण्यासाठी प्रथम अपील अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा वरिष्ठ दर्जाचा असेल, अशा अधिकाऱ्याची नियुक्ती करील.

**अपील**

९. (१) ज्याचा कलम ५ च्या पोटकलम (२) अन्वये अर्ज नाकारलेला असेल किंवा ज्याला विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत अधिसूचीत सेवा पुरविली नसेल अशा कोणत्याही पात्र व्यक्तीला, अर्ज नाकारल्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत किंवा विनिर्दिष्ट कालमर्यादा समाप्त झाल्यानंतर प्रथम अपील प्राधिकाऱ्यासमोर अपील दाखल करता येईल.

परंतु अपिलकर्त्यास वेळेत अपील दाखल करण्यापासून वाजवी कारणामुळेच प्रतिबंध केला होता अशी जर प्रथम अपील अधिका-याची खात्री पटली असेल तर, तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरदेखील, प्रथम अपील प्राधिका-यास अपील दाखल करून घेता येईल.

(२) प्रथम अपील प्राधिकाऱ्यास तो आदेशात विनिर्दिष्ट करील अशा कालावधीमध्ये पात्र व्यक्तीला सेवा पुरविण्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याला निदेश देता येईल किंवा अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीमध्ये त्यास ते अपील नाकारता येईल, अपील नाकारले असल्यास, तो अशाप्रकारे अपील नाकारण्याची कारणे लेखी नमूद करील.

परंतु अपिलावर निर्णय देण्यापूर्वी, प्रथम अपील प्राधिकारी, अपीलकर्त्याला तसेच पदनिर्देशित अधिकाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल.

(३) प्रथम अपील प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुध्दचे दुसरे अपील हे,ज्या दिनांकास प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा आदेश प्राप्त झाला असेल त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत किंवा जेथे अपीलकाराला, प्रथम अपील प्राधिकाऱ्याचा कोणताही आदेश प्राप्त झाला नसेल त्याबाबतीत पहिले अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसानंतर द्वितीय अपील प्राधिकाऱ्याकडे दाखल करता येईल.

परंतु अपील कर्त्यास वेळेवर अपील दाखल करण्यापासून वाजवी कारणामुळे प्रतिबंध केला होता याबाबत जर द्वितीय अपील प्राधिका-याची खात्री पटली तर, तीस दिवसांचा किंवा, यथास्थिती, नव्वद दिवसांचा अपील दाखल करण्याचा कालावधी जरी समाप्त झाला तरी द्वितीय अपील प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल.

(४) (क) द्वितीय अपील प्राधिकाऱ्याला, तो आदेशात विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत अपीलकर्त्यास सेवा पुरविण्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याला निदेश देता येईल किंवा त्यास अपील दाखल केल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीत अपील नाकारता येईल. अपील नाकारले असेल त्याबाबतीत, अशी अपील नाकारण्याची कारणे लेखी नमूद करील,

परंतू, कोणताही आदेश काढण्यापूर्वी द्वितीय अपील प्राधिकारी, अपीलकर्त्याला, तसेच पदनिर्देशित अधिकाऱ्याला किंवा यथास्थिति, प्रथम अपील प्राधिकाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल.

(ख) अधिसूचित सेवा पुरविण्याच्या आदेशासह द्वितीय अपील प्राधिकाऱ्यास कलम १० च्या तरतुदींनुसार पदनिर्देशित अधिकाऱ्यावर किंवा प्रथम अपील प्राधिकाऱ्यावर शास्ती लादता येईल.

(५) (क) पदनिर्देशित अधिकाऱ्याने, कलम ५ च्या पोट-कलम (२) मध्ये उल्लेखिलेली सेवा पुरविली नाही किंवा सेवेस मंजुरी दिली नसेल तेव्हा असे अनुपालन न केल्यामुळे व्यथित झालेल्या अर्जदारास, प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडे थेट अर्ज सादर करता येईल. हा अर्ज जणू काही ते प्रथम अपील आहे अशा रितीने निकाली काढण्यात येईल.

(ख) पदनिर्देशित अधिकाऱ्याने पोट-कलम (२) खालील सेवा पुरविण्याच्या आदेशाचे अनुपालन केले नसेल तेव्हा जर असे अनुपालन न केल्यामुळे व्यथित झालेल्या अर्जदारास, पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याच्या दिवसांपासून पंचेचाळीस

दिवसांनंतर द्वितीय अपील प्राधिकाऱ्याकडे थेट अर्ज सादर करता येईल. हा अर्ज जणू काही ते द्वितीय अपील आहे अशा रीतीने निकाली काढण्यात येईल.

१९०८ चा ५ (६) या कलमान्वये अपीलावर निर्णय करताना, प्रथम अपील प्राधिकाऱ्याला किंवा द्वितीय अपील प्राधिकाऱ्याला, पुढील बाबींच्या संबंधात, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतात तसेच अधिकार असतील,:-

**(क) दस्तऐवज किंवा अभिलेख सादर करण्यास फर्मावणे व त्याची तपासणी** करणे.

(ख) सुनावणीसाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याला व अपीलकर्त्याला समन्स पाठविणे आणि

(ग) विहित करण्यात येईल, अशी इतर कोणतीही बाब.

__शास्ती__

१०. (१) (क) पदनिर्देशित अधिकाऱ्याने पुरेशा व वाजवी कारणाशिवाय अधिसूचित सेवा पुरविण्यात कसूर केली आहे, असे प्रथम अपील प्राधिकाऱ्याचे मत बनले असेल तेव्हा, तो त्या पदनिर्देशित अधिकाऱ्यावर राज्य शासनाकडून राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा कमाल रकमेस अधिन राहून शास्ती लादील:

(ख) पदनिर्देशित अधिकाऱ्याने, पुरेशा व वाजवी कारणाशिवाय विनिर्दिष्ट कालमर्यादेच्या आत अधिसूचित सेवा पुरविण्यात कसूर केली आहे, असे द्वितीय अपील प्राधिकाऱ्याचे देखील मत बनले असेल त्याबाबतीत, त्यास, कारणे लेखी नमूद करुन प्रथम अपील प्राधिकाऱ्याने लादलेली शास्ती कायम ठेवता येईल किंवा त्यात बदल करता येईल:

परंतु, पदनिर्देशित अधिकाऱ्यावर कोणतीही शास्ती लादण्यापूर्वी, त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(२) प्रथम अपील प्राधिकाऱ्याने चूक करणा-या अधिका-याला गैरवाजवीपणे वाचविण्याचा प्रयत्न केला आहे किंवा कोणत्याही पुरेशा व वाजवी कारणाशिवाय विनिर्दिष्ट

कालमर्यादेच्या आत अपिलावर निर्णय देण्यात कसूर केली आहे, असे द्वितीय अपील प्राधिकाऱ्याचे मत बनले असेल तेव्हा, तो प्रथम अपील प्राधिकाऱ्यावर राज्य शासनाकडून राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा कमाल रकमेस अधीन राहून शास्ती लादील :

परंतु, प्रथम अपील प्राधिकाऱ्यावर कोणताही दंड किंवा शास्ती लादण्यापूर्वी, त्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

**नित्याचा कसूर करणाऱ्यांवरील जबाबदारी निश्चित करण्याची कार्यपध्दती**

११. (१) जर पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून नित्यानेच कसूर केली जात असेल तर, अपील प्राधिकारी राज्य शासनाला किंवा यथास्थिति, सार्वजनिक प्राधिकरणाला त्याची माहिती देईल आणि ते अधिसूचित सेवा देण्यात वारंवार विलंब केल्याबद्दल त्या पदनिर्देशित अधिका-याला जबाबदार धरुन, शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये, असे फर्मावणारी एक नोटीस त्याच्या विरुध्द काढील.

(२) ज्याच्याविरुध्द अशी नोटीस काढण्यात आली असेल त्या पदनिर्देशित अधिका-यास , अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत अभिवेदन सादर करता येईल. विहित मुदतीच्या आत द्वितीय अपील प्राधिकाऱ्याला असे कोणतेही अभिवेदन न मिळाल्यास, किंवा प्राप्त झालेला खुलासा समाधानकारक न वाटल्यास, द्वितीय अपील प्राधिकारी, एकतर, नावे पत्रात (डेबीट नोट) विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे शास्ती जमा करण्यासाठी अशा कसूरदार पदनिर्देशित अधिका-याला निदेश देणारे, किंवा त्या पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या पगारातून अशी रक्कम खर्ची घालण्यासाठी आणि ती कोषागारात जमा करण्यासाठी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या लेखा अधिकाऱ्याला निदेश देणारे एक नावे पत्र (डेबीट नोट) काढण्यास हक्कदार असेल :

परंतू, द्वितीय अपील प्राधिकाऱ्यास पदनिर्देशित अधिका-याच्या बाजूची कारणे वाजवी आणि समर्थनीय असल्याचे दिसून आल्यास, आणि पात्र व्यक्तींस सेवा पुरविण्यात झालेला विलंब हा त्याच्यामुळे नव्हे तर, दुसऱ्या एखाद्या पदनिर्देशित अधिका-यामुळे झाला असल्याच्या निष्कर्षाप्रत तो आला असेल तेव्हा, द्वितीय अपील प्राधिकाऱ्याने त्या

पदनिर्देशित अधिकाऱ्याविरुध्दची नोटीस मागे घेणे आणि अशा विलंबास जबाबदार असल्याचे आढळून आलेल्या अशा दुसऱ्या पदनिर्देशित अधिकाऱ्यावर नव्याने कारण दाखवा नोटीस बजावणे कायदेशीर असेल आणि पोट-कलम (१) व(२) मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती योग्य त्या फेरफारांसह लागू असेल.

(३) या अधिनियमाखालील जबाबदारी निश्चित करताना, द्वितीय अपील प्राधिकारी, त्या बाबतीत आदेश देण्यापूर्वी नैसर्गिक न्याय तत्वांचे पालन करील आणि पदनिर्देशित अधिकाऱ्याला किंवा यथास्थिती प्रथम अपील प्राधिकाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

**पुनरीक्षण**

१२. शास्ती लादण्यासंबंधातील द्वितीय अपील प्राधिकाऱ्याच्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या पदनिर्देशित अधिकाऱ्यास किंवा प्रथम अपील प्राधिकाऱ्यास, अशा आदेशाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येईल अशा अधिकाऱ्याकडे पुनरीक्षणासाठी अर्ज करता येईल, असा अधिकारी, विहित करण्यात येईल अशा कार्यपध्दतीनुसार तो अर्ज निकालात काढील;

परंतु, मुदतीत अर्ज सादर न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत राज्य शासनाच्या नामनिर्देशित अधिकाऱ्याची खात्री पटवून दिल्यास, त्यास, साठ दिवसांच्या उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतरदेखील असा अर्ज विचारार्थ दाखल करुन घेता येईल.

**राज्य अधिसूचित सेवा प्रदान समितीची रचना**

१३. (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, एक राज्य लोक सेवा प्रदान समिती घटित करील. तीमध्ये, मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव (प्रशासकीय सुधारणा), प्रधान सचिव, नगर विकास व प्रधान सचिव, ग्राम विकास आणि प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान यांचा समावेश असेल.

(२) अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उक्त समितीची कार्ये पुढीलप्रमाणे असतील:-

(क) समिती, अधिसूचित सेवा कार्यक्षमपणे प्रदान करण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत करावयाच्या उपाय योजनांची शिफारस करील :

(ख) समिती, सार्वजनिक प्राधिकरणामार्फत दिल्या जाणा-या अधिसूचित सेवा प्रदान हमीच्या कामावर देखरेख ठेवील.

**वार्षिक अहवाल**

१४.(१) राज्य अधिसूचित सेवा प्रदान समिती, प्रत्येक वर्ष संपल्यानंतर मागील वर्षामधील काळात आपल्या कार्याचा तसेच अधिसूचित सेवा देणा-या सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामगिरीचा मुल्यमापन अहवाल तयार करील आणि तो अहवाल राज्य शासनाला सादर करील.

(२) राज्य शासन, त्या समितीने सादर केलेला वार्षिक अहवाल राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवील.

**विनिर्दिष्ट मुदतीत सेवा पुरविण्यासाठी वातावरण निर्मिती करणे.**

१५. (१) अधिसूचित सेवा विनिर्दिष्ट कालमर्यादेत पुरविण्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून कसूर झाल्यास त्या प्रयोजनार्थ ती गैरवर्तणूक मानण्यात येणार नाही आणि त्याचा उद्देश पदनिर्देशित अधिका-यांना, पात्र व्यक्तींच्या अपेक्षांच्या प्रती संवेदनशील करणे व विनिर्दिष्ट कालमर्यादेत पात्र व्यक्तींना अधिसूचित सेवा पुरविण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करणे व ई-प्रशासन संस्कृती स्वीकारणे हे आहे.

(२) नित्याचा कसूरदार असणाऱ्या कोणत्याही पदनिर्देशित अधिका-यांच्या बाबतीत, त्या कसूरदार अधिकाऱ्याविरुध्द कारणे दाखवा नोटीस बजावून व त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी देवून संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाचा प्रमुख, या आशयाच्या निष्कर्षाची नोंद केल्यानंतर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यास सक्षम असेल.

स्पष्टीकरण — या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी, जर एखादा असा पदनिर्देशित अधिकारी जर तो एका वर्षात पन्नास पेक्षा अधिक कसूर करील. तर त्यास नित्याचा कसूरदार म्हणून समजण्यात येईल.

(३) सर्व पदनिर्देशित अधिकारी आणि अपील प्राधिकारी यांना क्षमतेत वाढ करण्यासाठी व विहित कालमर्यादेत अधिसूचित सेवा पुरविण्याची सुनिश्चिती करण्यासाठी

नियतकालिक प्रशिक्षण देण्यात येईल. राज्य शासन, सर्व संबंधित अधिकाऱ्यांना प्रशिक्षणाची सुविधा पुरवील आणि ते प्रशिक्षण अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या मूलभूत पाठयक्रमातील अभ्यासक्रमाचाच भाग असेल.

(४) पदनिर्देशित अधिकाऱ्याला प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी, ज्याच्याविरुध्द एका वर्षात कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही व जे अधिकारी विनिर्दिष्ट कालमर्यादेत सेवा पुरवित आहेत अशा पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या नावाने, शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा रोख रकमेच्या प्रोत्साहनाची सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखाने शिफारस करणे हे विधिसंमत असेल. अशा शिफारशीवरुन, शासन किंवा, यथास्थिती संबंधित सार्वजनिक प्राधिकरण, प्रशस्ती प्रमाणपत्रासह त्यास योग्य वाटेल असे प्रोत्साहन देण्यासाठी सक्षम असेल.

**मानीव सेवा - शर्ती**

१६. या अधिनियमाच्या तरतुदी हया पदनिर्देशित अधिका-याच्या आणि प्रथम अपिलिय प्राधिका-याच्या सेवा शर्ती असल्याचे मानण्यात येईल.

**पुरवणी**

१७. या अधिनियमाच्या तरतुदी हया शासन किंवा स्थानिक प्राधिकरणातील, किंवा यथास्थिति, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना लागू असतील असे, शिस्तविषयक व वित्तीय नियम आणि असे इतर सेवा नियम व विनियम यांना पूरक असतील, आणि त्या, शासकीय कर्मचारी किंवा स्थानिक प्राधिकरणाचे किंवा संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाचे कर्मचारी यांच्या सेवा शर्ती व वर्तणुकीचे नियमन करणाऱ्या अशा सेवा नियमांना व विनियमांना न्यूनीकारक ठरणार नाहीत.

**सदभावनेने केलेल्या कृतीस संरक्षण**

१८. या अधिनियमानुसार अथवा त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा दिलेले किंवा काढलेले आदेश यांनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**अधिकारितेस रोध.**

१९. कोणत्याही दिवाणी न्यायालयास, या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये अपील अधिकाऱ्याला ज्या बाबीवर निर्णय करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात निर्णय करण्याची अधिकारिता असणार नाही.

**इतर कायद्याची प्रयुक्ती अवरूध्द नसणे**

२०. या अधिनियमाच्या तरतुदी हया, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदीच्या जोडीला असतील आणि त्या न्यूनीकरण करणा-या नसतील.

**नियम करण्याचा अधिकार**

२१. (१) शासनास पूर्वप्रसिध्दीनंतर, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात मिळून एकुण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी कोणत्याही नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहांची सहमती झाली किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृह यांची सहमती झाली, व तशा आशयाचा त्यांचा निर्णय राजपत्रात अधिसूचित केला तर तो नियम असा निर्णय राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून, अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अमलात येईल किंवा यथास्थिति,मुळीच अमलात येणार नाही, तथापि असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राहयतेस बाध येणार नाही.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार**

२२. या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणताना कोणतीही अडचण उदभवली तर राज्य शासनास प्रसंगानुरूप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्याला आवश्यक

किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे करता येईल:

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम(१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

सही

(डॉ.पी.एस.मीना)
अपर मुख्य सचिव (प्र.सु.,र. व का.).

******

प्रस्तावित महाराष्ट्र लोकसेवा हमी विधेयक,२०१५ च्या मसुद्याच्या बाबतीत कोणत्याही सूचना किंवा हरकती खालील ई-मेलस् वरदेखील पाठविता येतील

१) acs.omca@maharashtra.gov.in

२) gad_18@maharashtra.gov.in